# 'सायंटिफिक इंडेक्स'मध्ये विवेकानंद कॉलेजमधील १४ संशोधक प्राध्यापकांचा समावेश

**कोल्हापूर :** ए. डी. सायंटिफिक इंडेक्स २०२३ या संस्थेने नुकतीच जागतिक पातळीवरील संशोधकांची क्रमवारी जाहीर केली आहे. या संशोधकांच्या अद्ययावत क्रमवारीत विवेकानंद कॉलेजमधील १४ वैज्ञानिक, संशोधकांचा समावेश आहे.

मिशीगन अमेरिकेतील विद्यापीठामार्फत हा निर्देशांक सन २०२१ पासून दर वर्षी जाहीर करण्यात येत आहे. अमेरिकेच्या विद्यापीठातील प्रा. मूरत आल्पर आणि प्रा. सिहान डॉजर या दोघांनी संयुक्तपणे 'आल्पर - डॉजर सायंटिफीक इंडेक्स' तथा 'ए.डी. सायंटिफिक इंडेक्स' विकसित केलेला आहे. त्यासाठी त्यांनी गुगल स्कॉलरवरील संशोधकांचा गेल्या पाच वर्षांतील एच-इंडेक्स, आय-टेन इंडेक्स हे निर्देशांक तसेच सायटेशन स्कोअर (उद्धरणे) इत्यादी बाबींचे पृथक्करण केले. जगभरातल्या २१,४३९ शैक्षणिक संस्थांमधील १३,४५,१८६ संशोधकांचा डाटा त्यांनी संकलित केला.

कृषी व वने, कला व स्थापत्य, वाणिज्य व व्यवस्थापन, अर्थशास्त्र, शिक्षणशास्त्र, अभियांत्रिकी व तंत्रज्ञान, इतिहास, तत्त्वज्ञान, धर्मशास्त्र, कायदे अभ्यास, वैद्यकीय व आरोग्य विज्ञान, मिशीगन नैसर्गिक शास्त्रे व सामाजिक शास्त्रे यांसह अन्य २५६ उपशाखांमधील जगभरातील संशोधकांचा समावेश या मानांकनामध्ये केला आहे. त्यातून 'वर्ल्ड सायंटिस्ट अँड युनिव्हर्सिटी रँकिंग- २०२३ जाहीर करण्यात आले आहे.

महाविद्यालयातील अनुक्रमे डॉ. संजय लट्टे (पदार्थविज्ञान), डॉ. अर्जुन कुंभार (रसायनशास्त्र), डॉ. दीपक गायकवाड (रसायनशास्त्र), डॉ. केदार उंडाळे (रसायनशास्त्र), डॉ. विशाल वाघमारे (संगणकशास्त्र), डॉ. अजिक्य पत्रावळे (रसायनशास्त्र), डॉ. संजय अंकुशराव (रसायनशास्त्र), डॉ. टेकचंद गीपाले (प्राणिशास्त्र), डॉ. भाऊराव दांगट (वनस्पतीशास्त्र), डॉ. इरफान मुजावर (संगणकशास्त्र), डॉ. राजश्री पाटील-शेंद्रे (संगणकशास्त्र), डॉ. गजानन सोनटक्के (प्राणिशास्त्र), कु. अर्चना राजमाने (रसायनशास्त्र रिसर्च फेलो), डॉ. गोवर्धन उबाळे (भूगोल) आदींचा समावेश आहे.

या मानांकनाबद्दल श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्थेच्या सचिव प्राचार्या सौ. शुभांगी गावडे, संस्थेचे सीईओ कौस्तुभ गावडे व विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांचे प्रोत्साहन व मार्गदर्शन लाभले.